**यशकथा** ६ फाल्गुन १९२४ (सायं. ५.३० वा.)
मंगळवार, दि. २५ फेब्रुवारी २००३

## "तेरा वर्षानंतर पिण्याच्या पाण्याचा टंचाई संपली"
## संगमेश्वर तालुक्यातील वाड्यांची यशकथा

'नेमेचि येतो उन्हाळा' आणि या उन्हाळ्याबरोबर दरवर्षी निर्माण होणाऱ्या पाणी टंचाईच्या समस्येला रत्नागिरी जिल्हा अपवाद नाही. दरवर्षी सुमारे साडेतीन हजार मिलीमीटर पाऊस पडूनही पावसाचे सर्व पाणी डोंगर उतारावरुन वाहत जावून समुद्राला मिळते आणि उन्हाळ्यात भूगर्भातील पाण्याचे स्त्रोत कोरडे पडल्याने पाणी टंचाईची भीषणतः सुरु होते. अखेरचा उपाय म्हणून टँकरने पाणी पुरवठ्याशिवाय पर्याय उरत नाही.

शासनाने अशा टँकरग्रस्त गावात आणि वाडी वस्त्यामध्ये कायम स्वरुपी पाणी पुरवठा योजना प्राधान्याने कार्यान्वित केल्याने रत्नागिरी जिल्ह्यातील अनेक वाडी-वस्त्या टँकरमुक्त होवू लागल्या आहेत.

**साखरपा-खंडवाडी**

संगमेश्वर तालुक्यातील साखरपा-खंडवाडी ही उंच डोंगरावर वसलेली पाचशे लोकवस्तीची वाडी. या वाडीसाठी पूर्वी रस्ता नसल्याने लोकांना अडीच किलोमीटर डोंगरद-या उतरुन डोक्यावरुन पाणी आणावे लागे. रस्ता झाल्यावर १९८६ पासून सुमारे तेरा वर्षे या वाडीला टँकरने पाणी पुरवठा सुरु होता. सन २००० मध्ये या गावासाठी सुमारे १४ लाख रुपये खर्चाची नळपाणी पुरवठा योजना कार्यान्वित झाल्यानंतर ही वाडी टँकरमुक्त होऊन येथील जनतेचा पिण्याच्या पाण्याचा वनवास कायमचा संपला.

साखरपा खंडवाडीसाठी जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागामार्फत २२०० मीटर अंतरावर डोंगराच्या पायथ्याशी विहीर खणण्यात आली त्यानंतर पाईप लाईनव्दारे डोंगरावरील साठवण टाकीत ३०० मीटर उंचीवर पंपाने पाणी साठविण्यात येत असून खंडवाडीत नळाने पाणी पुरविले जात आहे.

या योजनेमुळे आमच्या हालअपेष्टा कायमच्या संपल्याचे येथील महिलांनी सांगितले हे पाणी अमृत समजून पित असल्याचे त्यांचे सांगणे आहे. या गावचे सरपंच गणपत लिंगायत व पाणी पुरवठा आणि स्वच्छता कमिटीचे अध्यक्ष सिताराम चव्हाण यांनी या योजनेच्या पूर्ततेबद्दल समाधान व्यक्त केले. ही नळपाणी योजना ग्रामपंचायतीने ताब्यात घेतली असून तिची देखभाल जाणीवपूर्वक करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

**मौजे करंबेळे तर्फ देवळे गोताडवाडी**

संगमेश्वर तालुक्यातील मौजे करंबेळे तर्फ देवळे गोताडवाडी ही सुमारे दोनशे लोकवस्तीची वाडी उंच डोंगरावर असून येथील महिलांना २ किलोमीटर अंतरावरुन उंच घाटी चढून डोक्यावरुन पाणी आणावे लागत असे. १९८७ पासून

या गावात टँकरने पाणी पुरवठा सुरु होता. या गावात १३ लाख रुपये खर्चाची ग्रामीण नळपाणी पुरवठा योजना कार्यान्वित झाल्याने येथील टँकरचा पाणी पुरवठा बंद झाला आहे.

या गावचे सरपंच शशिकांत राजाराम काबदुले यांनी जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने २४० मीटर उंचावर पाणी चढवून ही अशक्यप्राय पाणी पुरवठा योजना कार्यान्वित केल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या गावच्या महिला मंडळाच्या अध्यक्षा अनुसया महादेव गोताड यांनी गेली १४-१५ वर्षे गोताडवाडीतील जनतेने पिण्याच्या पाण्यासाठी भोगलेल्या कष्टांचे वर्णन केले. पिण्याच्या पाण्याची वणवण संपली असून येथील महिलांचा पाणी आणण्यासाठी जाणारा वेळ रोजगारासाठी वापरला जात आहे. मुलांनाही पाण्याऐवजी आता शिक्षणाकडे वेळ देणे शक्य झाले आहे.

-------------